सहपत्र - A - 1



# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

## सभा व दप्तर कक्ष

ज्ञानगंगा घरोघरी

# विद्वत परिषद बैठक

# कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 64 |
| स्थळ | : | **प्रशासकीय इमारत विद्यापीठ सभागृह (Offline/Online)** |
| दिनांक | : | गुरूवार. 4 जुलै 2024 |
| वेळ | : | दुपारी 12 : 00 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

---

## 64 वी विद्वत परीषद मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्वत परिषद मंडळाची बैठक क्र.64 (ऑनलाईन व ऑफलाईन), गुरूवार दि. 4 जुलै 2024 सकाळी 12.00 वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू | अध्यक्ष |
| 02 | डॉ.जोगेद्रसिंह बिसेन, प्र-कुलगुरू **तथा** संचालक, बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| 03 | संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा | सदस्य |
| 04 | संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 05 | संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 06 | संचालक, विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 07 | संचालक, कृषी विद्याशाखा | सदस्य |
| 08 | संचालक, संगणक विद्याशाखा | सदस्य |
| 09 | संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | सदस्य |
| 10 | संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | सदस्य |
| 11 | संचालक, मूल्यमापन विभाग | सदस्य |
| 12 | उपग्रंथपाल, ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्र **तथा** डॉ. प्रकाश बर्वे | सदस्य |
| 13 | डॉ. लतिका गायकवाड | सदस्य |
| 14 | श्री. राजेंद्र वाघ | सदस्य |
| 15 | डॉ. दयाराम पवार | सदस्य |
| 16 | श्री. संजय राजाराम वझे, कल्याण – ऑनलाईन उपस्थिती | सदस्य |
| 17 | संचालक, स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निग आणि प्रो. राम ताकवले रिसर्च सेंटर | निमंत्रित सदस्य |
| 18 | संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकास विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 19 | परीक्षा नियंत्रक | निमंत्रित सदस्य |
| 20 | श्री. दिलीप भरड, कुलसचिव | सदस्य सचिव |

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | सदस्य |
| 02 | श्री. विलास विष्णू शिंदे | सदस्य |
| 03 | श्री. मधुकर गवळी | सदस्य |
| 04 | श्री. राजेंद्र विखे पाटील | सदस्य |
| 05 | श्री. धनंजय बेळे | सदस्य |
| 06 | श्री. महेश दाबक | सदस्य |
| 07 | श्री. संजय तांबट | सदस्य |
| 08 | श्री. राजेश पांडे | सदस्य |
| 09 | डॉ. अजय भामरे | सदस्य |
| 10 | डॉ. संजय चाकणे | सदस्य |

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 64.1.0 | | बैठकीसाठी ऑनलाईन\ऑफलाईन असलेल्या सर्व मा. सदस्यांचे स्वागत<br>कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी शब्दसुमनांनी स्वागत केले. मा. कुलगुरूंच्या मान्यतेने सभेला सुरुवात केली. |
| 64.2.0 | 64.2.1 | दि. 28 मे 2024 रोजी झालेल्या 63 व्या विद्वत परिषद बैठकीचे सुधारीत कार्यवृत्त वाचून कायम करणे. |
| | | **ठराव** - कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी 63व्या विद्वत परिषदेच्या सुधारीत कार्यवृत्ताचे वाचन केले. उपस्थित विद्याशाखा संचालकांनी आपआपल्या विद्याशाखांशी संबंधित ठरावाचा आशय तपासून घ्यावा असे मा. कुलगुरूंनी सुचित केले. विद्याशाखा संचालकांनी संबंधित ठरावांमध्ये काही दुरुस्त्या सुचविल्या.<br>ठराव क्र. 63.3.5 कृषी विज्ञान विद्याशाखा, ठराव क्रमांक 63.3.11 निरंतर शिक्षण विद्याशाखा, 63.3.12 शिक्षणशास्त्र विद्याशाखा<br>वरील ठरावांमध्ये दुरुस्त्या करून कार्यवृत्त अंतिम करण्यात यावे. कार्यवृत्तातील इतर ठराव मान्य करण्यात आले. तसेच दुरुस्त्यांसह कार्यवृत्ताला मान्यता देण्यात आली. |
| | 64.2.2 | 1) दि. 28 मे 2024 रोजी झालेल्या 63 व्या विद्वत परिषद बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल. |
| | | **ठराव** - कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी 63व्या विद्वत परिषदेच्या कार्यवाही अहवालाचे वाचन केले. उपस्थित विद्याशाखा संचालकांनी आपआपल्या विद्याशाखांशी संबंधित कार्यवाही अहवालाबाबत दुरुस्त्या सुचविल्या.<br>ठराव क्र. 63.3.1 स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग, ठराव क्रमांक 63.3.14 विज्ञान विद्याशाखा, ठराव क्रमांक 63.6.15.3 संगणक विद्याशाखा, 63.3.12 शिक्षणशास्त्र विद्याशाखा<br>वरील ठरावांमध्ये दुरुस्त्या करून कार्यवाही अहवाल अंतिम करण्यात यावा. कार्यवाही अहवालाला मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | | 2) दि. 2 जुलै 2024 रोजी झालेल्या 45 व्या नियोजन मंडळ बैठकीतील कार्यवृत्त वाचून कायम करणे. |
| | | **ठराव** - कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी 45व्या नियोजन मंडळ बैठकीच्या कार्यवृत्ताचे वाचन केले. उपस्थित विद्याशाखा विद्याशाखा संचालकांनी संबंधित ठरावांमध्ये काही दुरुस्त्या सुचविल्या.<br>ठराव क्र. 45.3.1 विद्यार्थी सेवा विभाग, ठराव क्रमांक 45.3.2 स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग, 45.4.6 कृषी विद्याशाखा<br>वरील ठरावांमध्ये दुरुस्त्या करून कार्यवृत्त अंतिम करण्यात यावे. कार्यवृत्तातील इतर ठराव मान्य करण्यात आले. तसेच दुरुस्त्यांसह कार्यवृत्ताला मान्यता देण्यात आली. |
| | कुलसचिव आणि सर्व विद्याशाखा सभा व दप्तर कक्ष | स्टॅट्यूटरी बैठकींचे इतिवृत्त, ठराव हे कायम स्वरुपी दप्तरी असणारे दस्तऐवज असल्यामुळे विषय, टिपणी व ठराव यांची भाषा अचूक असावी.त्यासाठी सर्व विद्याशाखा, कक्ष, केंद्र यांनी स्टॅट्यूटरी कमिटीमध्ये विषय सादर करण्यासाठी विषय, टिपणी याप्रमाणे मा. कुलगुरुंची मान्यता घेऊन प्रिंट आऊटसह सॉफ्ट कॉपी सभा व दप्तर कक्षाकडे सादर करावी.<br>तसेच बैठक झाल्यानंतर आपल्यापल्या विद्याशाखेशी संबंधित ठरावाची सॉफ्ट कॉपी सभा व दत्पर कक्षाकडे सादर करावी.<br>विषय, टिपणी, ठराव शुद्ध असण्यासाठी कुलसचिवांनी प्रत्येक विद्याशाखेतील प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी एक प्रशिक्षण शिबिर आयोजित करावे असे मा. कुलगुरूंनी सुचित केले. त्यास सर्वानुमते मान्यता दिली. |
| 64.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 64.3.1<br>स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग आणि प्रो. राम ताकवले रिसर्च सेंटर | **विषय** — स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंगची विद्याशाखा परिषद बैठक दि. 27 जून 2024 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर<br>**टिपणी** — स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंगची विद्याशाखा परिषद बैठक दि. 27 जून 2024 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीत 9 विषयांवर चर्चा झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेच्या अवलोकनार्थ आणि मान्यतेस्तव सादर... |
| | | **ठराव** - स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग विद्याशाखा संचालकांनी सदर विषयाबाबत केलेल्या सादरीकरणास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 64.3.2<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **विषय** — शिक्षणशास्त्र विद्याशाखेची विद्याशाखा परिषद बैठक दि. 29 जून 2024 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीचे सदर बैठकीचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर<br>**टिपणी** — शिक्षणशास्त्र विद्याशाखेची विद्याशाखा परिषद बैठक दि. 29 जून 2024 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीत 15 विषयांवर चर्चा झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेच्या अवलोकनार्थ आणि मान्यतेस्तव सादर... |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव** - शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालकांनी वरील विषयांचे सादरीकरण केले.<br>Ph.D. नियमित शिक्षणक्रम - शिक्षणशास्त्र आणि दूरशिक्षण या दोन्ही प्रणालीतील सुरू करण्यास मान्यता दिली. M83 : एम.ए. शिक्षणशाश्त्र संपर्कसत्र वेळापत्रक, अभ्यासकेंद्र व्यवस्थापन खर्च, संशोधन अहवाल सत्र 3 व 4 कार्यवाही व मूल्यमापनास मान्यता देण्यात आली. संशोधन अहवाल सादरीकरणातील कॉपी प्रकरणाबाबत वाङ्मय चौर्य हा गुन्हा असून त्यास शिक्षेची तरतुद आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या संशोधन अहवालात कॉपी केलेली असेल अशी प्रकरणे प्रमाद समितीकडे पाठविण्यात यावी व इतर विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्यासाठी परीक्षा विभागाकडे देण्याची सूचना केली.<br>एम.ए. शिक्षणशास्त्र या शिक्षणक्रमाच्या मूल्यमापन पद्धतीत (Open Book Exam Pattern) सुधारणा करावी. प्रश्नपत्रिकेचे स्वरूप उपयोजनात्मक असावे. उपयोजित, संश्लेषणात्मक, मूल्यमापनात्मक पातळीचे व नवनिर्मिती अशा स्तरांवर प्रश्नांची मांडणी असावी. परीक्षा विभागाने मॅग्नेटिक यांचेशी करार करून Proctor लावून ऑनलाईन पद्धतीने घेण्यात यावी. सदर सुधारणा ही शिक्षणशास्त्र विद्याशाखा व मूल्यमापन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करावी. प्रथम शिक्षणक्रम अध्ययन निष्पत्ती अभ्याक्रम अध्यनय निश्चित करावीत. त्यासाठी प्रथम प्राध्यापकांचे उपयोजनात्मक पातळीवर प्रश्न तयार करण्यासाठी प्रशिक्षण घ्यावे. प्रश्नपेढी तयार करणे, त्यांचे आश्य संपादन, भाषा संपादन करावे. परंतु असा बदल करावयाचा असेल तर तो नवीन तुकडीपासून अंमलात आणावा लागेल व त्याची माहितीपुस्तिकेत, वर्तमानपत्राद्वारे, पत्रकार परिषदेत, विद्यापीठाच्या साईटवर माहिती देऊन करावी या सूचनेचे स्वागत करण्यात आले. येणाऱ्या प्रवेश तुकडीपासून याची सुरूवात करावी. हे प्रायोगिक तत्वावर वरील सर्व तयार झाल्यानंतर एम. ए. शिक्षणशास्त्र राबवून हा प्रकल्प राबविण्याचे स्वागत करून मान्यता देण्यात आली.<br>बी.एड. प्रवेशाबाबत – CTC क्राफ्ट टिचर कोर्स केलेल्या विद्यार्थ्यांना बी.एड. प्रवेशासाठी पात्र करणेबाबत मा. न्यायालयाचा निर्णय सर्व विद्यार्थ्यांना लागू करता येणार नाही. जर CTC यांचा कोर्स मान्य केल्यास ATD आर्ट टिचर डिप्लोमा मान्य करावा लागेल. बी.एड.चे प्रवेशासाठी NCTE ची नियमावली लागू राहील. यासाठी एक समिती गठीत करून बाहेरील दोन व्यक्तींचा त्यात समावेश करावा. त्यांपैकी एक संचालक, परीक्षा मंडळ आणि एक कौंसिलमधील असावेत. CTC, ATD यांच्या समावेश नाही. सबब बी.एड. प्रवेश सॉफ्टवेअरमधून CTC काढून टाकण्यास मान्यता देण्यात आली.<br>सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>विद्याशाखा संचालकांनी सादर केलेल्या बी.एड. विशेष शिक्षण, दिव्यांगजनांसाठी सहाय्यक तंत्रज्ञान प्रमाणपत्र शिक्षणक्रम, बालसंगोपन प्रमाणपत्र शिक्षणक्रमात NCERT SCERT पाठ्यक्रमातील घटकांचा समावेश शालेय व्यवस्थापन पदविका लेखक, मानसशास्त्र प्रयोगशाळा विकसन या विषयांना मान्यता देण्यात आली.<br>विद्यापीठातील शिक्षणक्रमांचे अभ्यासकेंद्र घेण्यास मान्यता देण्यात आली. म्हणून मान्य विद्याशाखांतील अभ्यासकेंद्राचे मानधन या विषयावर संचालकांसोबत वेगळी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल असे मा. कुलगुरूंनी आदेशित केले. |

| | | |
|---|---|---|
| | 64.3.3<br>संगणक शास्त्र विद्याशाखा | **विषय** – संगणक शास्त्र विद्याशाखेची विद्याशाखा परिषद बैठक दि. 27 जून 2024 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर<br>**टिपणी** – संगणक शास्त्र विद्याशाखेच्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर 23 फेब्रुवारी 2023 आणि 19 जून 2024 रोजी झालेल्या विद्वत परिषदेत संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदेच्या अनुक्रमे दि. 17 जानेवारी 2023 आणि दि. 13 जून 2024 रोजी झालेल्या संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदेच्या बैठकीच्या इतिवृत्तांना मान्यता देण्यात आलेल्या Diploma in Web designing, Diploma in Computer Hardware and Networking, Diploma in Computerized Accounting and Management, Advanced Diploma in Computerized Accounting and Management, Certificate in Computerized Accounting आणि Advance Diploma in Computerized Accounting या शिक्षणक्रमांची मान्यता (विषय क्रमांक B-1/F-178/202307 आणि B-1/F-178/2023/15) रद्द करण्यास मान्यता देण्यात आली.<br>सदर विषय मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी सादर... |
| | | **ठराव** – संगणक शास्त्र विद्याशाखा संचालकांनी सदर विषयाबाबत केलेल्या सादरीकरणाविषयी पुढील ठराव करण्यात आले.<br>नवीन सुरू करण्यात येणाऱ्या अध्यायन साहित्यातील e-content तपासून घ्यावेत.<br>सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 64.4.0 | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळेचे विषय** |
| | 64.4.1<br>वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | **विषय** – वर्ष 2024-25 पासून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत Diploma in Event Management पदविका शिक्षणक्रम सुरु करणेबाबतचा विषय विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर<br>**टिपणी** – वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत BBA Event Management हा पदवी शिक्षणक्रम यापूर्वी विद्याशाखा परिषद व विद्वत परिषदेने मान्य केला आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. पदविका शिक्षणक्रमाचे प्रथम वर्ष आणि पदवी शिक्षणक्रमाचे प्रथम वर्ष सारखेच असेल. पदविका पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्याला पदवीच्या दुसऱ्या वर्षास थेट प्रवेश दिला जाईल. पदविका शिक्षणक्रम वर्ष 2024-25 पासून सुरू करण्याचा प्रस्ताव संचालकांनी मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर... |
| | | **ठराव** - वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत BBA Event Management हा पदवी शिक्षणक्रम यापूर्वी विद्याशाखा परिषद व विद्वत परिषदेने मान्य केला आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. पदविका शिक्षणक्रमाची संरचना कशी असेल ? अशा प्रश्नावर संचालकांनी पदविका शिक्षणक्रमाचे प्रथम वर्ष आणि पदवी शिक्षणक्रमाचे प्रथम वर्ष सारखेच असेल. तसेच प्रथम वर्षाचे शुल्कही समान असेल असे सांगितले. पदविका शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्याला पदवीच्या दुसऱ्या वर्षास थेट प्रवेश दिला जाईल. संचालक वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांनी मांडलेला प्रस्ताव तसेच पदविका शिक्षणक्रमाचे प्रवेश 2024-25 पासून सुरू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 64.4.2<br>विद्यार्थी सेवा विभाग | **विषय** – शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये अंध विद्यार्थी, जेलमधील कैदी किंवा शेतकरी आत्महत्या करणाऱ्यांचे पाल्य तसेच तृतीयपंथी विद्यार्थ्यांच्या शुल्क आकारणीबाबतचा प्रस्ताव विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर<br>**टिपणी** – संचालक, विद्यार्थी सेवा विभाग यांनी शुल्क आकारणीचा प्रस्ताव सादर केला. विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार यापूर्वी अंध विद्यार्थी, जेलमधील कैदी किंवा आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे पाल्य यांना शून्य (0) रुपये शुल्कामध्ये प्रवेश दिला जात असे. परंतु शून्य रुपये शुल्का ऐवजी रु. 200/- इतके नाममात्र शुल्क आकारण्याचा प्रस्ताव मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर... |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव** - संचालक, विद्यार्थी सेवा विभाग यांनी सादर केलेल्या अंध विद्यार्थी, जेलमधील कैदी किंवा आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे पाल्य यांना शून्य रुपये शुल्का ऐवजी रु. 200/- इतके नाममात्र शुल्क आकारून प्रवेश देण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

**सदस्य सचिव**

मा. अध्यक्ष तथा कुलगुरु
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२ २२२